महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५<br>ई-मेल - cadreexam२०२३@gmail.com<br>Web Site : https://mahadma.maharashtra.gov.in | नवी मुंबई महानगरपालिका इमारत,<br>७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर<br>रेल्वे स्टेशन जवळ (पु) नवी मुंबई - ४०० ६१४. |
| नपप्रसं/कक्ष-३अ/संवर्ग पदभरती/प्र.क्र.०१/२०२६/2464587 | दि. 27 AUG 2026 |


प्रति,
श्री. प्रविण कैलास लावंड,
At- Rui, Post Nahvi,
Taluka- Indapur, Dist.-Pune,
Pin-४१३१३२

विषय :- महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३
अंतिम निवडसूची व अतिरिक्त अंतिम निवडसूची मध्ये (प्रतिक्षासूचीतील) पात्र दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगत्व वैद्यकीय तपासणीस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :-
१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६
२. दिव्यांग कल्याण विभाग, शासन २०२४/प्र.क्र.१३९/दि.क्र.२ दि. १६ ऑगस्ट, २०२४.
३. संचालनालयाचे प्रसिध्दीपत्र क्र. नपप्रसं/कक्ष-३अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२६/२४३०७९७ दि. १९ ऑगस्ट, २०२६
४. संचालनालयाचे पत्र क्र. नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/कागदपत्र पडताळणी/२०२६/२४३३१५७ दि. २० ऑगस्ट, २०२६

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ करीता दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. २५ ऑक्टोबर, २०२३ ते २४ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय झालेले प्राप्त गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

दि. ११ जुलै, २०२३ रोजीच्या जाहिरातीत संवर्गनिहाय व श्रेणीनिहाय नमूद रिक्त पदांच्या संख्येनुसार सदर परीक्षेतील पात्र उमेदवारांची गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून एकूण ८. संवर्गाची भाग-३ अंतिम निवडसूची व भाग-४ अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतिक्षासूची) दि. १९ ऑगस्ट, २०२६ रोजी संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

संदर्भ क्र. ३ नुसार महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल/लेखापरीक्षक या संवर्गाची भाग-३ अंतिम निवडसूची व भाग-४ अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतिक्षासूची) प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% किंवा अधिक असणाऱ्या दिव्यांगाकरीता शासकीय नोकऱ्यामध्ये ४% आरक्षण निश्चित करण्यात आलेले असून उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार याचा लाभ केवळ पात्र दिव्यांग उमेदवारांना मिळणे अभिप्रेत आहे. त्यामुळे या संचालनालयाने कागदपत्र पडताळणी मध्ये पात्र झालेल्या दिव्यांग उमेदवारांचे त्यांच्या दिव्यांगत्वाबाबत वैद्यकीय तपासणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

दिव्यांग परिपत्रकानुसार दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत सदर उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करण्यात यावी याबाबत शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत.

त्यानुषंगाने संबंधित दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या दिव्यांगत्वाची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता शासकीय सुट्ट्या वगळून **सोमवार ते शनिवार सकाळी ९.०० ते १२.००** यावेळेत **प्रशासकीय इमारत, (हेड क्लार्क सेक्शन), २ रा मजला, सर ज. जी समुह रुग्णालये, मुंबई** येथे उपस्थित राहून वैद्यकीय तपासणी करुन घेण्याबाबत **वैद्यकीय अधिक्षक, सर ज. जी समुह रुग्णालये, मुंबई** यांना कळविले आहे. (संबंधित व्यक्ती:- श्री.अनिल दळवी, कार्यालय अधिक्षक किंवा श्री. अक्षय परब)

तरी आपण दिव्यांगत्व वैद्यकीय तपासणीकरीता मूळ दिव्यांग प्रमाणपत्र, UID कार्ड व त्यांच्या दोन सांक्षांकित प्रति तसेच अलीकडच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटोसह व दिव्यांगत्वाच्या वैद्यकीय तपासणीस रुग्णालयाद्वारे आकारण्यात येणाऱ्या आवश्यक फी सह उक्त नमूद ठिकाणी उपस्थित रहावे. सदर तपासणी तातडीने पूर्ण करणे बंधनकारक आहे.

दिव्यांगत्वाच्या वैद्यकीय तपासणीस अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांना नियुक्तीची आवश्यकता नाही असे समजून अंतिम निवडसूचीतून त्यांचे नाव वगळून भविष्यात नियुक्तीसाठी त्यांचा कसलाही विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**(मा. आयुक्त तथा संचालक यांच्या मान्यतेने.)**

Patil

**(डॉ. नीलम पाटील)**
**उपायुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई**